# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**



पुण्य नगरी | 4 | बुधवार, ३ फेब्रुवारी २०१६ | पुणे

# बुद्धिमान आणि पराक्रमी पिढीची गरज : भंडारी

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

सध्याच्या काळात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राची पुनर्रचना करण्यासाठी शिवचरित्राचा अभ्यास व चिंतन करून अत्यंत बुद्धिमान आणि पराक्रमी पिढी घडवावी लागेल. कारण दोन्ही अंगभूत गुण असल्याशिवाय हे राष्ट्र जिवंत राहणार नाही, असे प्रतिपादन अभय भंडारी यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'शिवचरित्र आणि सद्यःस्थिती' या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, माऊली करंडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे उपस्थित होते.

भंडारी म्हणाले, शिवाजी महाराजांचे पुतळे उभारण्यापेक्षा किंवा भगवे फेटे, टिळे लावून घोषणाबाजी करण्यापेक्षा त्यांची गुणसंपदा आम्ही अंगीकारायला हवी. त्यांची युद्धनीती, गडकिल्ले बांधण्याचे स्थापत्यकौशल्य, दूरदृष्टी, व्यवस्थापनशास्त्र, जलनीती, वनीकरणनीती, कूटनीती, राजनीती, राज्यव्यवहार कोश, युद्धशास्त्र, मातृभाषा प्रेम, मानसशास्त्र, माणसांची केलेली पारख, राष्ट्रनिष्ठ मावळे या सगळ्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. महाराजांनी अवघ्या ५० वर्षांच्या आयुष्यात केलेल्या कामाने आपल्या सर्वांना प्रचंड प्रेरणा दिली आहे. सामान्य माणसाचे एका घरासाठी आयुष्य पणाला लागते. अशा वेळी साडेतीनशे वर्षांपूर्वी सर्वच गोष्टी प्रतिकूल असताना शिवाजी महाराजांनी ३५० गडकिल्ल्यांचा अफाट पसारा उभा करून .हिंदवी स्वराज्याची स्थापना कशी केली असेल याचा विचार करण्याची गरज आहे.

सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. परिचय प्रा. जे. डी. वाळुंज यांनी करून दिला.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख